# प्रेसनोट पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण दिनांक 03 / 11 / 2023

| अ.क्र. | पो.स्टे.अप.क्र. कलम | फिर्यादीचे नाव | आरोपीचे नाव | घटनास्थळ | घटना.ता. वेळ | दाखल.ता. वेळ | हकिकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | लोणी 303/2023 कलम 379 भादंवि | निलेश शाहुराव दारोकार वय 36 वर्षे व्यावसाय नोकरी म. रा. वि. वि. कंपणी वरिष्ठ तंत्रज्ञ | नागेश पांडुरंग खडसे वय 37 वर्ष रा. अंजनगाव बारी | ग्राम निरसाना | 03/11/2023 चे 15/30 वा. दरम्यान | 03/11/2023 वेळ 13/43 वा. | हकीकत अश्या प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांना मोबाईल वर माहिती मिळाली की निरसाना गावालगत डी पी वर गावातील लोकांनी एक इसम डी पी वरील विद्युत साहित्याची चोरी करताना पकडले आहे त्यावरून फिर्यादी हे घटनास्थळी गेले असता यातील आरोपी याचे हातात एक पेंन्चीस व डी पी मधील बसबार किंमत अंदाजे 12000/- रू चा चोरून नेतांना मिळून आला. वरून सदर गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 2 | सरमसपुरा 278/2023 कलम 324,504 भा.द.वि. | रमेश सोनुजी नाडे वय 60 वर्ष रा. मंजुरपुरा अचलपुर | सौ रेखा निलेश नाडे वय 32 वर्ष रा. मंजुरपुरा अचलपुर | मंजुरपुरा अचलपुर | 02/11/023 चे 23/00 वा. दरम्यान | 03/11/2023 चे 01/31 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद आरोपी ही फिर्यादी ची सुन असुन फिर्यादीच्या मुलाचे व सुनेचे घरगुती कारणावरुन भांडण सुरु असता फिर्यादी हे सोडविण्यासाठी गेले तर आरोपीने म्हटने की तुम्ही आमच्या मध्ये कशाला बोलता असे म्हणुन शिवीगाळ केली व हातातील लाटने फिर्यादीचे कपाळावर मारून जखमी केले वरुन गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 3 | सरमसपुरा 279/2023 कलम 379 भा.द.वि. | आकाश दुर्योधनराव मानकर वय 28 वर्ष रा. हरम | अज्ञात | ग्राम हरम | 02/11/2023 चे 10/00 वा. ते 03/11/2023 चे 06/00 वा. दरम्यान | 03/11/2023 चे 10/47 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादीने त्याचे मालकीचा फॉर्मट्रक 45 कंपनीचा ट्रक्टर त्याचे घरासमोर उभा केला असता त्यातील एक्साईड कंपनीची लाल रंगाची ट्रक्टरची बॅटरी किमंत 7800/- रू ची रा्त्री दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 4 | रहीमापूर 184/2023 कलम 324, 323, 504, 506 भा.द.वि. | सौ कांताबाई रमेश मोहोड वय 60 वर्ष रा. मु-हा देवी ता. अंजनगाव सूर्जी | राहुल रमेश मोहोड वय 36 वर्षे रा. मु-हा देवी ता. अंजनगाव सुर्जी | ग्राम मु-हा देवी | 02/11/023 चे 20/30 वा.दरम्यान | 03/11/2023 चे 01/03 वा. | हकीकत अशाप्रकारे आहे कि नमूद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व तिचे पती घरी आराम करीत असताना तिचा मुलगा आरोपी हा दारू पिऊन आला व मला दारू पिण्याकरिता पैसे दे असे म्हटले तेव्हा फिर्यादीने माझ्याजवळ पैसे नाही असे म्हटले असता आरोपी याने फिर्यादी सोबत वाद करून बाजूला असलेली काठी हातात घेऊन तिचे उजव्या बाजूचे मांडीवर व कमरेवर मारल्यामुळे तिला वळ आले व शिवीगाळ करू लागला तर फिर्यादी हिची मुलगी भांडण सोडवण्यात आली असता तिला सुद्धा लोटलाट करून जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट व मेडी सर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | पथ्रोट 350/ 2023 कलम 324, 504,34 भा.द.वि. | संजय बाबूराव टेकाम वय 56 वर्ष धंदा शेती | 1 सचिन पंजाबराव श्रीनाथ वय 29 वर्ष 2 पंजाबराव जयराम श्रीनाथ वर्ष 59 वर्ष 3 मंगेश पंजाबराव श्रीनाथ वय 34 वर्ष सर्व रा. शिंदी | ग्राम शिंदी | 02/11/023 चे 21/00 वा. ते 21/30 वा. दरम्यान | 02/11/2023 चे | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे दारुच्या नशेत एकमेकांशी बाद होवुन व बोलचाल होवुन आरोपी हा जख्मी ला शिवीगाळ करीत असल्याने जख्मीने आरोपीला विचारले की तु मला शिवीगाळ का करतो या वरुन आरोपीने जख्मीला तीक्ष्ण हत्याराने वार करून जख्मी केले तसेचं ईतर दोन आरोपीने लाथा भुक्कयानी मारहाण करुन शिविगाळ केली अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 6 | वरूड 706/2023 कलम 379 भा.द.वि. | सरतर्फे पोहवा रविंद्र वामनराव बावणे ब.नं. 262 स्था.गु.शा. अमरावती ग्रामीण | रामचंद्र भाउरावजी ठाकरे वय 42 वर्ष रा. मोरचुंद ता. वरूड | चिंचरगव्हाण बसस्थानक 15 किमी दक्षिण | 03/11/2023 चे 03/15 वा. ते 03/30 वा. | 03/11/2023 चे 10/15 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ. ता. वेळी व ठिकानी फि व स्था.गु.शा पोस्टाफ हे पो. स्टे. वरूड हददीत पेट्रोलींग करीत असतांना मिळालेल्या गुप्त बातमीवरून नमुद घ. ता. ठिकानी नाकाबंदी करीत असतंाना एक हिरव्या रंगाचा मुडके आणि ट्रॅक्टर असलेलो ट्रॅक्टर सशयास्पद स्थितीत येतांना दिसल्याने फि ने ट्रॅक्टर चालकास ट्रॅक्टर कडेला लावण्यास सांगुन त्याची पाहणी केली असता सदर ट्रॅक्टर मुंडा JOHNDER A5045D कपंनीचा MH-27BB-1845 क्रमांकाचा त्याला जोडुन असलेल्या विना क्रमांकाची हिरव्या रंगाची ट्रॉली मध्ये काळया रंगाची अंदाजे 1 ब्रास रेती किंमत 5000/- रू आढळुन आली वरून सदर ट्रक्टर चालकास पंचासमक्ष रेती च्या रॉयल्टी बाबत विचारण केली असता तसेच सदर ट्रॅक्टर व रेती च्या मालकाबाबत विचारपुस केली असता ट्रॅक्टर चालकाने उडवाउडवीचे उत्तर दिल्याने नमुद फि व पंच यांची सदर ट्रॅक्टर चालक हा रेतीची चोरटी वाहतुक करीत असल्याची खात्री झाल्याने रेतीची चोरटी वाहतुक करण्याकरीता वापरलेला ट्रॅक्टर मुंडा JOHNDER A5045D कपंनीचा MH-27BB-1845 क्रमांकाचा त्याला जोडुन असलेली हिरव्या रंगाची ट्राॅली किं अं 4,00,000 /- रू आणि ट्रॉली मधील अंदाजे 1 ब्रास वाळु किंमत अंदाजे 5000/- रू असा एकुन 4,05,000/- रू चा मुददेमाल पंचासमक्ष जप्त केला अषा फि च्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | शिरखेड 358/2023 कलम 379,109 भा.द.वि. | सर तर्फे ASI संतोष महादेवराव मुंदाने बक्कल नंबर 992 पो.स्टे. LCB अमरावती ग्रामीण | 1 सोमनाथ अडकित्ता धुर्वे वय 30 वर्ष 2 फरार लोकेश गोमकारे वय 35 वर्ष दोन्ही रा.सिंबोरा ता. मोर्शी | ग्राम नया वाठोडा ते निरपिंगळाई रोडवरील निदा गावाकडे जाणाऱ्या चौकात सात किमी पूर्व | 02/11/023 चे 23/00 वा. ते 23/35 वा. दरम्यान | 03/11/2023 चे 01/34 वा. | हकीकत अशाप्रकारे आहे कि यातील नमूद घता वेळी व ठिकाणी मिळालेल्या गुप्त बातमीवरून पंच व पोलीसस्टाफ सह अवैद्य रेती वाहतुकीबाबत नाकाबंदी केली असता नमूद आरोपी क्रमांक 1 हा आरोपी क्रमांक दोन याचे सांगण्यावरून एक निळया रंगाचा सोनालिका डी.आय. 47 कंपनीचा ट्रॅक्टर विना क्रमांकाची लाल रंगाची ट्रॉली किंमत अंदाजे 400000/- रुपये व एक ब्रास रेती किंमत अंदाजे 5000/- रुपये असा एकूण 405000/- रुपयाचा मुद्द्येमाल ची चोरटी वाहतूक करताना पंचा समक्ष मिळून आल्याने नमूद आरोपीचे कृत्य कलम 379,109 भादविप्रमाणे होत असल्याने आरोपी विरुद्ध गुन्हा नोंद करून तपासात घेतला. |
| 8 | तिवसा 420/2023 कलम 379 भा.द.वि. | नामदेव लहुजी ठाकरे वय 63 वर्ष धंदा किराना दुकाण रा. बुरांडे लेआउट,गुरुदेव नगर,राम मंदिर ज़वऴ वाढ क्र 03वर्धा जि.वर्धा | अज्ञात | राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज मंदिर परिसर मोझरी 8 किमी पश्चिम | 30/10/023 चे 09.30 वा. ते 02/11/2023 चे 10/00 वा.दरम्यान | 03/11/23 चे 11/52 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमूद फिर्यादी यानी यांची मोटर सायकल क्र MH-32 T-7382 घेवून मोझरी येथे संत तुकडोजी महाराज पुण्यतिथी निमित्त आले असता व मोटर सायकल हि महाद्वार जवळ उभे करून दर्शनाला गेले असता ती कोणी तरी अज्ञात चोरट्यांनी त्या ठिकाणावरुन चोरुन नेली. त्यांची अंदाजे किंमत 25000/- रुपये अशा प्रकारे फिर्यादीचे जबाणी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात आहे. |

पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण
करीता